मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन,२७०,भांबुर्डा,सेनापती बापट मार्ग,पुणे-१६.
ईमेल - pcmu.smart@gmail.com दूरध्वनी क्र.- ०२० २५६५६५७७/७८

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

SMART

जाक्र पीपी-एमएपी/स.प्र.अ./ १२९४ /२०२२ दि. ०१/०९/२०२२.

प्रति,

नोडल अधिकारी,पीआययु,

कृषी/पशुसंवर्धन/माविम/MSRLM व VSTF.

**विषय:- स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्राथमिक मान्यता मिळालेल्या संस्थांनी विहित मुदतीत सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) सादर करणेबाबत...**

**संदर्भ:-** दि. २४/८/२०२२ रोजीचे क्षेत्रीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक.

उपरोक्त विषयान्वये व संदर्भीय आढावा बैठकीमधील क्षेत्रीय अधिकारी यांचे मागणीनुसार प्राथमिक मान्यता मिळालेल्या सिबिओंपैकी काही सिबिओ या प्राथमिक मान्यता मिळालेनंतर व बराच पाठपुरावा केल्यानंतरही सविस्तर प्रकल्प अहवाल(FPP) सादर करीत नाहीत/टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे.तसेच प्राथमिक मान्यता रद्द करणेबाबतही लेखी देत नाहीत.यामुळे इच्छुक संस्थांनाही वेळेत लाभ मिळत नाही/देता येत नाही.परिणामी प्रकल्पाची गती मंदावते.

त्यानुषंगाने ज्या सिबिओंना प्राथमिक मान्यता देऊन ९० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे अशा संस्थांना सर्व आवश्यक अभिलेख्यांसह सविस्तर प्रकल्प अहवाल संबंधित जिल्हा स्तरावर (DIU कडे)सादर करणेसाठी दि.३०/०९/२०२२ पर्यंत मुदत द्यावी.या कालावधीत संबंधित संस्थांनी सर्व आवश्यक अभिलेख्यांसह सविस्तर प्रकल्प अहवाल सादर न केल्यास त्यांना दिलेली प्राथमिक मान्यता रद्द करण्याची शिफारस आपले स्तरावून करणेत यावी.तसेच यापुढे प्राथमिक मान्यता दिलेनंतर ९० दिवसांच्या आत सर्व आवश्यक अभिलेख्यांसह सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) संबंधित जिल्हा स्तरावर (DIU कडे)सादर न केल्यास आपले स्तरावून सदर सिबिओंची प्राथमिक मान्यता रद्द करणेची शिफारस करावी.तसेच जिल्हा सिबिओ निवड लक्षांकाच्या मर्यादेत पुढील पात्र संस्थेची प्राथमिक मान्यतेसाठी शिफारस करावी.याबाबत आपले स्तरावून सर्व संबंधितांना तात्काळ अवगत करावे.

(ज्ञानेश्वर बोटे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक,स्मार्ट.

PP MAP(22-23)/MANE/22